धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________________ दिनांक : २२/१२/२०१४

# ‘धर्मराज्य पक्षा’चे ठामपा आयुक्तांना निवेदन
# लोकमान्य नगर पाडा नं. ४ येथील नाले व शौचालय यांची साफसफाई व दुरूस्ती करण्याची मागणी

**प्रतिनिधी**

दि. २२ – लोकमान्य नगर पाडा नं. ४ येथील पाण्याच्या टाकीच्या शेजारी असलेल्या नाल्यांच्या साफसफाई अभावी नाल्यामध्ये मोठ्याप्रमाणात कचरा साचला आहे. त्यामुळे सभोवतालच्या परिसरात या साठलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. या दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, तसेच नाल्यात साठलेल्या कचऱ्यामुळे डासांची निर्मिती होवून डेंग्यू व मलेरिया या सारख्या रोगांचा प्रार्दुभाव होण्याची दाट शक्यता आहे. उघड्या नाल्यामुळे एखादा अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तरी सदर नाल्यांची त्वरित साफसफाई करण्यात यावी व नाले सिमेंट कॉंक्रिटने बंदिस्त करण्यात यावेत, तसेच, लोकमान्य नगर पाडा नं. ४ येथे ५ जानेवारी २०१० रोजी निर्मल स्वच्छता अभियान अंतर्गत बांधण्यात आलेले सुलभ शौचालय नादुरूस्त झालेले आहे. अवघ्या चार वर्षात या इमारतीच्या बांधकामाचे पोपडे निघू लागलेत, पाण्याच्या टाकीचे झाकण गायब झाले आहे, शौचालयाचे दरवाजे गायब झालेले आहेत, तर नियमित स्वच्छतेअभावी तसेच ड्रेनेज फुटल्यामुळे येथे दुर्गंधीचे साम्राज्य पसरलेले आहे. विद्युत दिव्यांची सोय नसल्याने शौचालयास अंधारातच जावे लागते. यामुळे तत्काळ विजेची सोय करण्यात यावी, तसेच शौचालयासाठी पाण्याचीही व्यवस्था करण्यात यावी. यासंदर्भात दि. ४ फेब्रुवारी–२०१४ व दि. २० फेब्रुवारी–२०१४ रोजी प्रभाग समितीशी पत्रव्यवहार करण्यात आलेला होता, परंतु आजतागायत यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. काही दिवसांपूर्वी साफसफाई अभावी लोकमान्यनगर पाडा नं. ४ येथील अशाच एका सुलभ शौचालयात स्फोट घडून एका मुलाला आपला जीव गमवावा लागला होता, तसेच एक व्यक्ति जखमी झाली होती. तरी अशाप्रकारची दुर्घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी तत्काळ योग्य ती कार्यवाही करून, नादुरूस्त शौचालयांची त्वरीत दुरूस्ती करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात यावेत, अशी मागणी यावेळी **‘धर्मराज्य पक्षा’**तर्फे ठामपा आयुक्तांकडे करण्यात आली. आयुक्तांनी योग्य ती कार्यवाही लवकरात लवकर करण्याचे आश्वासन **धर्मराज्य पक्ष** शिष्टमंडळास दिले.

यावेळी धर्मराज्य पक्षाचे ठाणे जिल्हा सचिव नरेंद्र पंडित, प्रभाग अध्यक्ष(प्रभाग क्र. १०) समीर गोलतकर, प्रभाग अध्यक्ष(प्रभाग क्र. १३) महेश क्षिरसागर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

ए/ए२०३, ‘पांचजन्य’-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, ‘पांचजन्य’, शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*“सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!”...*